# मुंबई लोहमार्ग पोलिस
# आपला रेल्वे पोलिस

# KNOW YOUR RAILWAY POLICE

(रेल्वे पोलिसांच्या कर्तव्यांबाबत संक्षिप्त माहिती देणारी पुस्तिका)

रेल्वे पोलिस हेल्पलाईन : ९८३३३३११११

रेल्वे पोलिस नियंत्रण कक्ष : ०२२ - २३७५९२०१ , २३७५९२८३

हरविलेल्या व्यक्तींचा शोध : www.shodh.gov.in



# रेल्वे पोलिस कर्तव्य माहितीपुस्तिका

## महाराष्ट्र पोलिसांच्या ५३ व्या ध्वजारोहण दिनाच्या सन्मानार्थ
## दिनांक २ जानेवारी, २०१३ रोजी प्रकाशित

## सतर्कता हीच सुरक्षितता

१) रेल्वे डब्यात किंवा रेल्वे स्टेशन परिसरात कोणतीही अनोळखी / संशयास्पद वस्तू , बॅग आढळल्यास त्यास न हाताळता, स्पर्श न करता त्याची खबर तात्काळ आर.पी.एफ. / जी.आर.पी. यांना द्यावी.

२) सभोवतालच्या संशयित हालचाली व घटनांवर लक्ष ठेवून सुरक्षिततेबाबत जागरुक राहावे.

३) अनोळखी इसमांकडून दिल्या जाणाऱ्या खाद्य-पेय पदार्थात गुंगीकारक द्रव्य मिसळले असण्याची शक्यता असल्याने ते स्वीकारु नये / खाऊ पिऊ नये.

४) गर्दीच्या वेळी रेल्वेमध्ये चढताना किंवा उतरताना हॅण्डबॅग / पर्सची चेन उघडून मौल्यवान वस्तुंची चोरी होण्याची शक्यता असते म्हणून शक्यतो ते टाळावे अथवा पुरेशी दक्षता घ्यावी.

५) चोरट्यांकरिता सहजप्राप्य प्रलोभन ठरेल अशा पद्धतीने दागिन्यांचे प्रदर्शन करु नये.

६) गर्दीमुळे तसे घडल्याचे भासवून कोणताही महिला / पुरुष प्रवासी विनाकारण अंगावर रेलत असेल / धक्काबुक्की करत असेल तर त्यापासून सावध राहावे.

७) महिलांनी रात्रीच्या वेळी शक्यतो पोलिस तैनात असलेल्या महिलांच्या डब्यातूनच प्रवास करावा अथवा गर्दी असणाऱ्या डब्यात बसावे.

८) पोलिस स्टेशनच्या ठाणे अंमलदाराने केलेल्या कारवाईने समाधान झाले नसल्यास प्रभारी अधिकारी अथवा वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांना भेटावे.

९) नागरिकांना मदत करणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे तसेच
पोलिसांना सहकार्य करणे हे नागरिकांचे कर्तव्य आहे.

१०) आपल्या सामानाची, मौल्यवान वस्तुंची, लहान मुलांची, वृद्ध व परावलंबी व्यक्तींची विशेष काळजी घ्यावी.

११) प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे स्थानकांवर CCTV कॅमेरे कार्यान्वित आहेत.

१२) आणीबाणीच्या प्रसंगी तसेच संशयित व्यक्ती, वस्तू अथवा घटनेबाबतची माहिति कळविण्यासाठी GRP अथवा RPF शी त्वरित संपर्क साधावा.

१३) हरविलेल्या व्यक्तींबाबत तसेच मुंबई, ठाणे, नवी मुंबई क्षेत्रातील रेल्वे अपघातांमध्ये जखमी, मयत झालेल्या व्यक्तींबाबत माहिती देणारी वेबसाईट मुंबई लोहमार्ग पोलिसांनी तयार केली असून ती www.shodh.gov.in अशी आहे. तिचा वापर नागरिकांनी अवश्य करावा.

**मध्य रेल्वे सुरक्षा बल हेल्पलाइन - १२७५ , पश्चिम रेल्वे सुरक्षा बल हेल्पलाइन - १२७६**

**रेल्वे पोलिस हेल्पलाइन - ९८३३३३११११**

## जाहीर आवाहन

काही दृष्टप्रवृत्तीच्या लोकांकडून तसेच रेल्वेलाइन लगतच्या मोकळ्या जागेत, मैदानात खेळणाऱ्या मुलांकडून गंमत–चेष्टा–मस्करी म्हणून धावत्या रेल्वेवर दगड फेकून मारण्याचे प्रकार घडतात.

फेकलेला दगड हा रेल्वेच्या वेगामुळे फेकण्याच्या वेगापेक्षा कैक पटीत जास्त वेगाने प्रवाशांना लागून प्रवासी गंभीर जखमी, अंशत: अथवा पूर्णत: अपंग होतो अथवा प्राणास मुकतो.

अशा दुर्दैवी घटनांना आळा घालण्यासाठी अशा प्रवृत्तीचे प्रबोधन करुनच त्यांना परावृत्त करता येईल. त्यांचे मनपरिवर्तन झाले तरच त्यांच्या वर्तनात परिवर्तन शक्य आहे.

सर्व जागरुक, सूज्ञ, सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या जबाबदार नागरिकांनी यासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.

अशा दुर्घटनेत जखमी होणारा रेल्वे प्रवासी आपला परिचित, स्नेही, मित्र, नातेवाईक असू शकतो अथवा खुद्द आपण स्वत: असू शकतो.

असे गैरप्रकार करणाऱ्यांची माहिती असल्यास ती कृपया रेल्वे पोलिसांना कळवावी.

अशी माहिती कळवितांना स्वत:चा नाव–पत्ता, स्वत:ची ओळख सांगण्याची आवश्यकता नाही.

## चोरी अथवा इतर तक्रार दाखल करण्याबाबत तसेच चोरीस गेलेला मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केल्यानंतर तो परत मिळविण्याबाबत माहिती.

१. प्रवास सुरु करताना किंवा प्रवासादरम्यान झालेल्या चोरीबाबत अथवा इतर गुन्ह्याबाबत ट्रेनमधील RPF कर्मचाऱ्याकडे किंवा TTE यांच्याकडे उपलब्ध असलेल्या FIR फॉर्ममध्ये प्रवासी आपली तक्रार नोंदवू शकतात किंवा गंतव्य रेल्वे स्टेशनवरील पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करु शकतात.

२. गुन्ह्यातील चोरीस गेलेला माल पोलिसांनी हस्तगत केल्यानंतर तो कायदेशीर बाबींच्या पूर्ततेस्तव पोलिस ठाण्यात जमा केला जातो. फिर्यादीच्या अर्जानुसार संबंधित न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे तो फिर्यादीस परत केला जातो.

## महिला व बाल प्रवासी यांच्या मदतीसाठी उपाययोजना

१) पोलिस स्टेशन स्तरावर महिला सुरक्षितता / दक्षता समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. आयुक्तालय व परिमंडळ स्तरावर महिला लैंगिक छळवाद प्रतिबंधक समित्या व महिला कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. महिला सुरक्षितता समितीच्या प्रत्येक मासिक बैठकीत कामकाजाचा आढावा घेतला जातो.

२) रात्री ८.३० ते सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान प्रत्येक लोकल ट्रेनमधील महिलांच्या दोन बोगींमध्ये प्रत्येकी एक सशस्त्र पोलिस कर्मचारी नेमण्यात येतो.

३) महिलांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे प्रशासनाकडून बहुतेक सर्व रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर महिलांच्या डब्यासमोर CCTV कॅमेरे लावण्यात आले आहेत.

४) महिला व बालकांसंदर्भात घडणारे गुन्हे गांभीर्याने व प्राधान्याने त्वरित हाताळले जातात.

५) अनाथ, बालमजूर, भिक्षेकरी बालकांची माहिती पोलिसांना द्या.

६) प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये महिला व बाल कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

७) महिला व बालकांसाठी काम करणाऱ्या अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींना योग्य ती मदत पोलिस स्टेशनकडून दिली जाते.

८) धावत्या ट्रेनमधील महिला आणि बालकांच्या सुरक्षितता व सहायतेसाठी हेल्पलाइनवर संपर्क साधावा. CHILD HELPLINE - 1098

# रेल्वे सुरक्षा बल – Railway Protection Force (RPF) यांची कर्तव्ये
# रेल्वे पोलिस – Government Railway Police (GRP) यांची कर्तव्ये

| | | |
|---|---|---|
| | **१) महिला प्रवासी** | |
| **१.** | **महिलांसाठी राखीव असलेल्या डब्यात पुरुषांनी प्रवेश अथवा प्रवास करणे.** | |
| | RPF | रेल्वे कायदा कलम १६२ प्रमाणे कारवाई करणे. |
| | GRP | रेल्वे सुरक्षा बलाला मदत करणे |
| **२.** | **लोकलमधील महिला प्रवाशांना संरक्षण देणे.** | |
| | RPF | प्लॅटफॉर्मवर व प्रवासादरम्यान ट्रेनमध्ये सुरक्षा पुरविणे |
| | GRP | RPF च्या पुरेशा मनुष्यबळाअभावी लोकलमधील महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी दोन महिला आरक्षित डब्यात रात्री प्रत्येकी एक कर्मचारी पुरविणे. |
| **३.** | **रेल्वेमध्ये महिलाबाबत घडणारे गुन्हे व अपराध** | |
| | RPF | पीडितांना रेल्वे पोलिसांकडे मदतीसाठी त्वरित घेऊन जाणे. |
| | GRP | गुन्हा दाखल करुन, तपास करुन गुन्हा उघडकीस आणणे आरोपी अटक करून दोषसिद्धीसाठी पुरेसा पुरावा गोळा करुन न्यायालयात दोषारोपपत्र सादर करणे. |
| **४.** | **कौटुंबिक कलहामुळे निराधार झाल्याने रेल्वे स्टेशन परिसरात आढळलेल्या महिला.** | |
| | RPF | ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी रेल्वे पोलिसांकडे त्वरित सुपूर्त करणे. |
| | GRP | पालकांचा शोध घेऊन समुपदेशन करुन पालकांच्या ताब्यात देणे.<br>पालक न आढळल्यास महिला वसतिगृहात रवानगी करणे. |
| | **२) अपंग** | |
| **१.** | **अपंगांकरिता राखीव असलेल्या डब्यातून अनधिकृत प्रवास करणे** | |
| | RPF | रेल्वे कायदा कलम १५५ प्रमाणे कारवाई करणे. |
| | GRP | १. रेल्वे सुरक्षा बलाला मदत करणे   २. अपंग व्यक्तीस सहाय्य करणे. |

| | | |
|---|---|---|
| **३) अनाथ / निराधार बालके** | | |
| **१.** | **अनाथ / निराधार बालके आढळल्यास** | |
| | RPF | अनाथ / निराधार बालके ताब्यात घेऊन रेल्वे पोलिसांकडे सोपविणे. |
| | GRP | अनाथ / निराधार बालकांबाबत ज्युव्हेनाइल जस्टिस ॲक्ट प्रमाणे कारवाई करणे. |
| **२.** | **कौटुंबिक कलहामुळे निराधार झाल्याने रेल्वे स्टेशन परिसरात आढळलेली बालके.** | |
| | RPF | अनाथ / निराधार बालके ताब्यात घेऊन रेल्वे पोलिसांकडे सोपविणे. |
| | GRP | पालकांचा शोध घेऊन समुपदेशन करुन पालकांच्या ताब्यात देणे.<br>पालक न आढळल्यास बालगृहात रवानगी करणे. |
| **४) फेरीवाले / भिकारी** | | |
| **१.** | **अनधिकृत फेरीवाले / भिकारी** | |
| | RPF | रेल्वे कायदा कलम १४४ प्रमाणे कारवाई करणे. |
| | GRP | शहर पोलिस / रेल्वे सुरक्षा बलाला मदत करणे. |
| **५) रेल्वे तिकीटांचा काळाबाजार** | | |
| **१.** | **रेल्वे तिकिटांचा काळाबाजार करणे** | |
| | RPF | रेल्वे कायदा कलम १४३ प्रमाणे कारवाई करणे. |
| | GRP | रेल्वे सुरक्षा बलाला मदत करणे. |
| **६) दखलपात्र गुन्हे व अदखलपात्र अपराध** | | |
| **१.** | **भारतीय दंडविधान संहिता (IPC) व इतर कायद्याचे उल्लंघन केल्याने घडलेले गुन्हे** | |
| | RPF | पोलिसांना मदत करणे. |
| | GRP | गुन्ह्यास प्रतिबंध करणे, घडल्यास दाखल करुन, तपास करुन उघडकीस आणणे आरोपी अटक करून दोषसिद्धीसाठी पुरेसा पुरावा गोळा करुन न्यायालयात दोषारोपपत्र सादर करणे. |

## ७) रेल्वे अपघाताबाबत

| | | |
|---|---|---|
| **१.** | **रेल्वे अपघातात जखमी होणाऱ्या/मरण पावणाऱ्या प्रवाश्यांबाबत.** | |
| | RPF | जखमी/मयत इसमास तात्काळ वैद्यकीय मदत उपलब्ध करुन देणे. |
| | GRP | न्याय-वैद्यकीय प्रकरणातील तरतुदीप्रमाणे कारवाई करणे. जखमी/मयताच्या नातेवाईकांचा शोध घेणे. जखमीस/मयतास नातेवाईकांच्या ताब्यात देणे. |
| **२.** | **रेल्वे अपघात** (Untoward Incident) | |
| | RPF | घटनेचा अहवाल RPF च्या व रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ कळवून, तपास करुन रेल्वे अधिकाऱ्यांना अहवाल सादर करणे. |
| | GRP | घटनेच्या अनुषंगाने पंचनामा व अन्वेषण करणे. रेल्वे वाहतूक पूर्ववत करण्याबाबत प्रमाणपत्र देणे. आवश्यकतेप्रमाणे गुन्हा दाखल करुन, तपास करुन, गुन्हा उघडकीस आणणे, आरोपी अटक करून दोषसिद्धीसाठी पुरेसा पुरावा गोळा करुन दोषारोपपत्र सादर करणे. वरिष्ठ पोलिस अधिकारी व महाराष्ट्र शासनास अहवाल सादर करणे. |

## ८) रेल्वे सुरक्षिततेबाबत

**घातपात विरोधी कारवाया**

RPF

१. प्रवाश्यांच्या सामानाची स्कॅनिंग मशिनद्वारे तपासणी करणे.

२. संशयित आढळल्यास पोलिसांच्या ताब्यात देणे.

३. CCTV द्वारे गुप्तपणे निगराणी ठेवून अनुचित प्रकार घडणार नाही याची काळजी घेणे.
गुन्हा घडल्याचे लक्षात आल्यास त्याची माहिती पोलिसांना देणे.

४. लांब पल्ल्याच्या मेल/एक्सप्रेस ट्रेनवर गस्तकामी कर्मचारी नेमणे.

५. रेल्वेच्या मालमत्तेचे तसेच रेल्वे प्रवासी व त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करणे.

GRP

१. संशयित प्रवासी/सामान यांची प्रत्यक्ष तपासणी करणे.

२. संशयितांवर कारवाई करणे.

## ९) गुन्हे

**रेल्वे कायदयान्वये घडणारे अपराध**

RPF

रेल्वे कायदा कलम १३७ ते १३९,१४९ ते १५३ ते १७४ अन्वये कारवाई करणे.

**१३७** – विनातिकीट/पासाशिवाय प्रवास करणे.

**१३८** – तिकीट/पासाच्या अंतरापलिकडे प्रवास करणे.

**१३९** – विनातिकीट प्रवाश्यांना ट्रेनमधून उतरविणे.

**१४१** – धोक्याच्या साखळीचा गैरवापर.

**१४२** – अन्य प्रवाश्यांच्या आरक्षित तिकीटावर प्रवास करणे.

**१४३** – रेल्वेच्या तिकिटांचा काळाबाजार करणे.

**१४४** – रेल्वे हद्दीत परवान्याशिवाय फेरीवाल्याचा व्यवसाय करणे, भिक मागणे.

**१४५** – ट्रेनमध्ये दारु पिऊन उपद्रव, असभ्य वर्तन करणे, अश्लिल भाषा वापरणे.

**१४६** – रेल्वे कर्मचाऱ्यांच्या कामात अडथळा आणणे.

**१४७** – रेल्वे हद्दीत बेकायदेशीर प्रवेश करणे, प्रवेश केल्यानंतर निघून जाण्यास नकार देणे.

**१५३** – प्रवाश्यांच्या सुरक्षिततेला हेतुपुरस्सर बाध आणणे, धोका निर्माण करणे (स्टंटबाजी).

**१५४** – अविचाराने किंवा निष्काळजीपणाने प्रवाश्यांच्या सुरक्षिततेस बाध आणणे.

**१५५** – आरक्षित डब्यात अनधिकृत प्रवेश/प्रवास करणे.

**१५६** – ट्रेनच्या छत/टप, पायरी किंवा इंजिनमधून प्रवास करणे (स्टंटबाजी).

**१५७** – पास किंवा तिकिटांत फेरबदल किंवा खाडाखोड करणे.

**१५९** – वाहनचालकाने किंवा वाहकाने रेल्वे हद्दीत रेल्वे कर्मचाऱ्यांच्या किंवा पोलिस अंमलदारांच्या वाजवी आदेशाचे पालन न करणे

**१६०** – रेल्वे फाटक हेतूपुरस्सर उघडणे किंवा त्याची नासधूस करणे.

**१६१** – राखण नसलेल्या फाटकातून वाहनाने रुळ निष्काळजीपणे ओलांडणे.

**१६२** – महिला आरक्षित डब्यात प्रवेश अथवा प्रवास करणे.

**१६४** – ट्रेनमधून घातक मालाची वाहतूक करणे.

**१६५** – घृणास्पद अथवा आक्षेपार्ह खाद्यपदार्थांची वाहतूक करणे.

**१६६** – फलक किंवा दस्तऐवज काढून टाकणे किंवा त्यावरील मजकूर पुसणे किंवा खराब करणे.

**१६७** – ट्रेनमध्ये धूम्रपान करणे.

**१७२** – रेल्वे कर्मचाऱ्याने कर्तव्यावर असताना मादक पदार्थाचे सेवन करणे.

**१७४** – रेल रोको आंदोलनास रुळावर बसून, अगर अन्य रितीने रेल्वेस अडथळा निर्माण करणे.

GRP

१. **रेल्वे कायद्यातील कलम १५०,१५१,१५२ प्रमाणे गुन्हा दाखल करुन, तपास करुन, उघडकीस आणणे, आरोपी अटक करून दोषसिद्धीसाठी पुरेसा पुरावा गोळा करुन दोषारोपपत्र सादर करणे.**

**१५०** – ट्रेनवर दगड, लाकूड फेकणे किंवा रुळावर ठेवणे, रेल्वेचे स्लिपर, रुळ काढणे, सैल करणे, रुळाचे सांधे फिरवणे, दिशा बदलणे, सिग्नल वा दिवा दाखवून रेल्वेची सुरक्षितता धोक्यात आणणे.

**१५१** – आग किंवा स्फोटकाद्वारे रेल्वे संपत्तीचे नुकसान करणे.

**१५२** – प्रवाश्यांना धोका पोचविण्याच्या उद्देशाने लाकूड, दगड फेकून मारणे.

२. रेल्वे कायद्यातील इतर कारवायांमध्ये रेल्वे सुरक्षा बलाला मदत करणे.

**भारतीय दंडविधान संहिता (IPC) व इतर कायद्याचे उल्लंघन केल्याने घडलेले गुन्हे**

RPF पोलिसांना मदत करणे.

GRP गुन्हे दाखल करुन, तपास करुन उघडकीस आणणे आरोपी अटक करून दोषसिद्धीसाठी पुरेसा पुरावा गोळा करुन न्यायालयात दोषारोपपत्र सादर करणे.

## १०) कायदा व सुव्यवस्था

RPF यार्ड, प्लॅटफॉर्म, रेक (Rake) व अन्य रेल्वे मालमत्तेचे, प्रवाश्यांचे संरक्षण करणे.

GRP
१. स्थानिक पोलिसांच्या व रेल्वे सुरक्षा बलाच्या संपर्कात राहून गोपनीय माहिती काढणे. आवश्यक तेव्हा योग्य तो बंदोबस्त नेमणे.
२. विविध खाजगी/ शासकीय यंत्रणांशी संपर्क, सहकार्य आणि समन्वय ठेवणे.
३. हत्यारबंदी आदेश जारी करुन त्याची अंमलबजावणी करणे.
४. कायद्यातील तरतुदींचा आढावा घेऊन परिस्थितीनुरुप कायद्याची अंमलबजावणी करणे व सुव्यवस्था राखणे.

# मुंबई लोहमार्ग पोलिस

| | | |
|---|---|---|
| **पोलिस आयुक्त, लोहमार्ग मुंबई** | **२३७५९२५१, फॅक्स-२३७५९२८३** | **५५७८५** |
| **नियंत्रण कक्ष, वाडीबंदर, पी. डिमेलो मार्ग** | २३७५९२८३ / २३७५९२०१ | ५५७८७ |

| **मध्य परिमंडळातील रेल्वे पोलिस स्टेशन** | | **रेल्वे ☎** |
|---|---|---|
| छत्रपती शिवाजी टर्मिनस | २२६२०१७३ | ५५७७१ |
| दादर | २४१८०६९४ | ५७३०५ |
| कुर्ला | २६५००७१२ / १४२० | ६६८६२ |
| ठाणे | २५३६१३१८ | ६११७८ |
| डोंबिवली | ०२५१-२८६१६२४ | ६३३५४ |
| कल्याण | ०२५१-२३१५०१३ | ६३३४२ |
| कर्जत | ०२१४८-२२२११० | ६८९३४ |
| वडाळा | २४१६४६८८ | ६२३०४ |
| वाशी | २७८१२६९६ | ६०५३८ |
| पनवेल | २७४६७१२२ | ६४२३० |
| **पश्चिम परिमंडळातील रेल्वे पोलिस स्टेशन** | | |
| चर्चगेट | २२०१०८७६ | २२९७९ |
| मुंबई सेंट्रल | २३०७०१९७ | ४५५१६ |
| बांद्रा | २६४२२०४७ | ४७४१६ |
| अंधेरी | २६२५४७३५ | ३००१६ |
| बोरीवली | २८०५४८६९ | ३४०१७ |
| वसई | ०२५०-२३३६९७७ | ३८०१६ |
| पालघर | ०२५२५-२५५४४९३८ | ४९७१६ |

# सतर्कता हीच सुरक्षितता

महाराष्ट्र पोलिस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## पोलिस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई